प्रशासकीय अधिकारी गट-अ या संवर्गातील
अधिकाऱ्याच्या बदलीबाबत...

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन आदेश क्रमांक : एमएफएस-२०१९/प्र.क्र. १०८ (१) /फ-८.
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २२ ऑगस्ट, २०१९.

संदर्भ :- १. उप सचिव,सामान्य प्रशासन विभागयांचे पत्र क्र.एसआरव्ही २०१२/ प्र.क्र.२४४/ का.१२ दि.३१/०७/२०१९.
२. मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दि.२४/०७/२०१९ रोजी पार पडलेल्या बैठकीचे गृह विभाग /वि.शा.१ ब यांनी निर्गमित केलेले इतिवृत्त.
३. प्रधान मुख्य वनसरंक्षक (वन बल प्रमुख) नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-९/मवसे/मुले /सवस/बदली/ प्र.क्र.१९/१४२३/१९-२० दि.०९/०८/२०१९.

प्रस्तावना -

गडचिरोली,चंद्रपुर व गोंदिया या नक्षलग्रस्त व आदिवासी जिल्ह्यातील गट-अ ते गट- ड मधील विविध संवर्गातील सर्व रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि.२४/०७/२०१९ रोजी बैठक पार पडली असून सदर बैठकीत विभागनिहाय गडचिरोली,चंद्रपुर व गोंदिया या जिल्ह्यातील विविध संवर्गातील रिक्त पदांचा आढावा घेण्यात आला आहे. तसेच या जिल्ह्यातील रिक्त पदे दि.१५/०८/२०१९ पूर्वी बदली / पदोन्नतीने भरण्याचे मा.मुख्य सचिव यांनी निर्देश दिले आहेत.

तसेच मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली डावी-कडवी विचारसरणीबाबत एकसुत्री कृती यंत्रणा संरचेनेनुसार राज्यस्तरीय गठीत समितीची दि.२४/०७/२०१९ रोजी बैठक पार पडली असून यामध्ये मा.मुख्यमंत्री यांनी गडचिरोली जिल्ह्यामध्ये नियुक्त झालेल्या सर्व विभागातील अधिकारी/ कर्मचारी यांना त्यांच्या नियुक्ती/ बदलीने होणाऱ्या पदस्थापनेच्या आदेशामध्ये गडचिरोली जिल्ह्यातील २ वर्षाच्या सेवेनंतर कार्यमुक्ततेच्या दिनांकाचा समावेश करण्यात यावा, असे निर्देश दिले आहेत.वरील आदेश विचारात घेऊन गडचिरोली,चंद्रपुर व गोंदिया या नक्षलग्रस्त व आदिवासी जिल्ह्यातील वन विभागातंर्गत प्रशासकीय अधिकारी गट-अ या संवर्गातील रिक्त पदे बदलीने भरण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन आदेश :-

वन विभागातंर्गत प्रशासकीय अधिकारी गट-अ या संवर्गातील खाली नमूद अधिकारी यांची शासकीय कर्मचाऱ्याची बदल्यांचे विनियम आणि शासकीय कामे पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार बदलीने पदस्थापना करण्यात येत आहे. :-

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव व सद्याची पदस्थापना	बदलीने पदस्थापना	अभिप्राय
१	श्री.एफ.एम.चंदनखेडे , प्रशासकीय अधिकारी, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संशोधन शिक्षण व प्रशिक्षण) पुणे यांचे कार्यालय	प्रशासकीय अधिकारी, मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) गडचिरोली	अधिनियम २००५ मधील कलम ४ (५) नुसार (रिक्त पदावर) (नक्षलग्रस्त व आदिवासी विभागातील रिक्त पदे भरण्याबाबतचे शासनाचे निर्देश विचारात घेऊन प्रशासकीय कारणास्तव)

२. वरील अधिकाऱ्याच्या बदलीने रिक्त होणाऱ्या पदावर अन्य अधिकाऱ्याच्या नियुक्तीबाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

३. वरील अधिकाऱ्याला बदलीने देण्यात आलेली पदस्थापना दि.३०/०६/२०२१ पर्यत राहील.

४. सदर नियुक्ती / पदस्थापना दिलेल्या अधिकाऱ्याला नियंत्रक अधिकाऱ्यांनी नवीन नियुक्तीच्या जागी हजर होण्यास दि.२३/०८/२०१९ रोजी एकतर्फी कार्यमुक्त करावे. तसेच, संबंधित अधिकाऱ्याला नवीन नियुक्तीच्या जागी हजर होण्यासाठी कोणत्या दिनांकास कार्यमुक्त केले आणि ते नवीन नियुक्तीच्या जागी कोणत्या दिनांकास हजर झाले, याबाबत संबंधित नियंत्रक अधिकाऱ्यांनी शासनास anil.dhas@nic.in या ई-मेल संकेतस्थळावर त्वरीत कळवावे.

५. संबंधित अधिकाऱ्याला शासनाच्या पूर्वपरवानगी शिवाय कोणत्याही कारणास्तव रजा मंजूर करु नये. तसेच म.ना.से. (रजा) नियम १९८१ मधील नियम - ३० (सी) नुसार मूळ कार्यालयाने बदली झालेल्या अधिकाऱ्यांचे कोणत्याही प्रकारचे रजेचे अर्ज स्विकारु नयेत. असे अर्ज प्राप्त झाल्यास, ते संबंधित अधिकाऱ्यांच्या मूळ पत्त्यावर नोंदणी पोच देय डाकेने परत करावेत. मूळ कार्यालयाकडे बदली झालेल्या अधिकाऱ्यांचे रजेचे अर्ज पाठविल्यास सदर अर्जाची दखल घेण्यात येणार नाही.

६. सदरहू बदली आदेशानुसार संबधित अधिकारी नियुक्तीच्या ठिकाणी हजर न झाल्यास वा कोणत्याही प्रकारचा दबाव आणून बदली रद्द करण्याचा प्रयत्न झाल्यास, ही कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम २३ चे उल्लंघन करणारे असल्यामुळे, ती गैरवर्तणूक समजून त्यांचेविरुद्ध शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८२२१४५३४५६११९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Atul Ashok Kode

Digitally signed by Atul Ashok Kode
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a12403ed93b05957cb29b7e95265d3ac52d366233b80405514f23a879132aeec, serialNumber=f0d5ee4c99cc9cbfa8761b3ddc7bd6650bad33302f33a35400ad5aad2291371a, cn=Atul Ashok Kode
Date: 2019.08.22 15:09:41 +05'30'

(अतुल कोदे)
सह सचिव (वने)
महसूल व वन विभाग.

प्रति,

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य,नागपूर.

२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक), नागपूर.
३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन दुय्यम संवर्ग), नागपूर
४) अपर प्रधान मुख्य वनंसंरक्षक (संशोधन शिक्षण व प्रशिक्षण) पुणे
५) मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), पुणे / गडचिरोली.
६) महालेखापाल,महाराष्ट्र-१/२ (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र २, मुंबई / नागपूर
७) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे/गडचिरोली
८) मा.मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव
९) मा.राज्यमंत्री (वने) यांचे खाजगी सचिव
१०) प्रधान सचिव (वने) यांचे स्वीय सहाय्यक
११) संबंधित अधिकारी (प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), म.रा.नागपूर यांचे मार्फत)
१२) वन विभागातील सर्व कार्यासने
१३) निवड नस्ती (फ-८ कार्यासन).